**कृपया प्रसिध्दीसाठी** **8 ऑक्टोबर 2012**

## भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी मुंबई येथे 8 ऑक्टोबर 2012 रोजी पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन

### *कृषी मंत्री श्री. शरद पवारांचा मच्छिमारांना ठेंगा - राम नाईक*

**मुंबई,सोमवार:** ''मच्छिमारांना डिझेलवरील परतावा वाढवून प्रति लिटर रु. 4 देणे, मच्छिमारांना मिळणा-या कर्जाच्या व्याजाचा दर 4 टक्के करणे आणि बारा नॉटिकल मैलाच्या पलिकडील समुद्रातील कायदा आणि व्यवस्था या तीन मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी 26 एप्रिल 2012 रोजी मच्छिमारांच्या सोबत झालेल्या चर्चेच्यावेळी दिले होते. तथापि, आता त्यांनी सकारात्मक निर्णय न घेता मच्छिमारांना ठेंगा दाखविला आहे. त्याविरुद्ध मच्छिमारांचे आंदोलन उभे करण्यात येईल'', असा इशारा भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी मुंबई येथे आज पत्रकार परिषदेत दिला. त्यावेळी भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश मच्छिमार आघाडीचे संयोजक श्री. राजेंद्र मेहेर आणि मुंबईचे संयोजक श्री.सागर किल्लेकर हे उपस्थित होते.

मच्छिमारांच्या प्रश्नांविषयी अधिक माहिती देताना श्री.राम नाईक म्हणाले,''वाढलेले डिझेलचे दर लक्षात घेऊन मच्छिमारांना प्रति लिटर रु.4 परतावा देण्यात यावा तसेच फक्त दारिद्र्यरेषेखालील मच्छिमारांनाच परतावा देण्याची अट रद्द करावी अशी मागणी घेऊन मच्छिमार नेत्यांच्या सोबत दिल्ली येथे 26 एप्रिल 2012 रोजी सविस्तर चर्चा करण्यात आली होती. त्यावेळी दारिद्र्यरेषेखालील कोणत्याही मच्छिमाराकडे स्वतःच्या मालकीची बोट असूच शकत नाही असे प्रतिपादन करुन ही अट रद्द केली तरच मच्छिमारांना या योजनेचा लाभ मिळू शकेल, तसेच वाढलेले डिझेलचे दर लक्षात घेऊन परताव्याची जाहीर केलेली रक्कमही वाढवून प्रति लिटर रु.4 करण्यात यावी अशी मागणी केली होती. तसेच 2012-2013 च्या अर्थ संकल्पात शेतक-यांच्या कर्जावरील व्याजाचा दर 7 टक्के करण्याचा निर्णय जाहीर करुन वेळेवर हप्ता भरणा-यांना 3 टक्क्यांची सवलत दिली जाईल म्हणजेच 4टक्के व्याज दराने कर्ज मिळेल असे जाहीर करण्यात आले होते. मच्छिमारी ही सागरी शेतीच मानली जाते म्हणून मच्छिमारांनाही हा सवलतीचा व्याजदर देण्यात यावा अशीही मागणी करण्यात आली होती. याशिवाय बारा सागरी मैलांच्या पलिकडील समुद्रात विशेष आर्थिक क्षेत्र - एक्स्लुझिव्ह इकॉनॉमिक झोन (इइझेड) मध्ये निर्माण होणारे कायदा आणि व्यवस्थेचे गंभीर प्रश्न सोडविण्यासाठी कायदा बनविण्यात यावा अशीही मागणी करण्यात आली होती. याप्रकरणी 17 मार्च 2009 रोजी असा कायदा करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे असे कृषी मंत्रालयाने सांगितल्यास तीन वर्षे उलटली तरीही अद्याप कायदा झाला नाही, हेही कृषी मंत्री श्री. शरद पवार यांच्या निदर्शनास यावेळी आणून देण्यात आले होते.''

‘‘वरील तीनही प्रश्नांबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी 26 एप्रिल 2012 रोजी दिले होते. त्या चर्चेनंतर कोणताही स्पष्ट निर्णय न झाल्यामुळे श्री. शरद पवार यांना स्मरणपत्र पाठविण्यात आले होते. त्या स्मरणपत्राला त्यांचे 21 सप्टेंबर 2012 रोजीचे उत्तर प्राप्त झाले असून त्यावरुन दारिद्र्यरेषेखालील मच्छिमारांनाच डिझेलचा परतावा देण्याच्या भूमिकेत बदल करण्यात आलेला नाही असे स्पष्ट झाले आहे, तर विशेष आर्थिक क्षेत्रातील कायदा व सुव्यवस्थेबाबत कायदा करण्यासंबंधीचे विधेयक तयार करण्याची प्रक्रिया अद्यापही चालूच असल्याचे सांगण्यात आले आहे. मच्छिमारांना सवलतीच्या 4 टक्के व्याजाने कर्ज देण्याबद्दलची सूचना 12 व्या पंचवार्षिक योजनेच्या सुधारित आराखड्यात समाविष्ट करण्याचा विचार सुरु आहे असेही पत्रात म्हटले आहे. याचाच व्यवहारातील अर्थ अद्यापि कोणताही निर्णय झाला नाही असा होतो. मच्छिमारांच्या प्रश्नांसंबंधी कृषी मंत्री श्री. शरद पवार यांच्याशी 2007 पासून वेळोवेळी सविस्तर चर्चा करुनही कोणताच सकारात्मक निर्णय काँग्रेस आघाडी सरकारने केला नाही. यावरुन कृषी मंत्री श्री.शरद पवार मच्छिमारांना ठेंगा दाखवित आहेत हे स्पष्ट होते. सरकारच्या या संवेदनाशून्य निष्क्रीयतेविरुद्ध भारतीय जनता पार्टी जनजागृतीचे अभियान हाती घेऊन आंदोलन करेल’’, असेही श्री. राम नाईक यांनी सांगितले.

**(कार्यालय सचिव)**

**संलग्न : कृषी मंत्री श्री. शरद पवार यांचे 21 सप्टेंबर 2012 चे पत्र.**

शरद पवार
**SHARAD PAWAR**

D.O. No. 2573 /AM

कृषि एवं खाद्य प्रसंस्करण उद्योग मंत्री
भारत सरकार
**MINISTER OF AGRICULTURE & FOOD PROCESSING INDUSTRIES**
**GOVERNMENT OF INDIA**

सत्यमेव जयते

**No.30035-23/2004-Fy(T-1)**
**21st September, 2012**

Dear Shri Ram Naik

Kindly refer to your letter No.104 dated 01.07.2012 regarding fisheries related issues of coastal fishermen of Maharashtra.

I have got the issues contained in your letter examined. Regarding the issue of regulating fishing in EEZ, the Ministry of Agriculture is in the process of finalizing a draft Bill for the purpose. As regards the diesel subsidy, during 11th Plan the subsidy was enhanced to ₹3 per litre being provided only to the fishers of BPL category. Regarding the issue of interest subvention on the loan taken by fishermen, the matter would be proposed for incorporation in the revised schemes for 12th plan.

With regards,

Yours sincerely,

(Sharad Pawar)

श्री. राम नाईक
का जनसंपर्क कार्यालय-मुंबई
27 SEP 2012
Office of
Shri Ram Naik - Mumbai

Shri Ram Naik,
9, Shivsmriti,
51, Jayaprakash Nagar,
Goregaon East,
Mumbai-400063.

**Office : Room No. 120, Krishi Bhawan, New Delhi-110 001 Tel.: 23383370, 23782691 Fax : 23384129**
**Resi. : 6, Janpath, New Delhi-110 011 (India) Tel. : 011-23018870, 23018619 Fax : 011-23018609**
**E-mail : sharadpawar.sp@gmail.com**